**महाराष्ट्र शासन**

क्रमांक.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०२/को.प्र.२

वित्त विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
तिसरा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. - १२ जुलै, २०१८

**संदर्भ**- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००४/ प्र.क्र.१५/ १२, दि.२५.०५.२००६.
२) वित्त विभाग, पत्र क्र.विविआ-२०१७/प्र.क्र.२३९/प्रशा-२, दि.०४.१२.२०१७
३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. संकीर्ण २०१२/प्र.क्र.५४/१८ (र व का) दि.११.०८.२०१४

**कार्यालयीन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(१) व (२) अंतर्गत प्रत्येक विभाग प्रमुख/कार्यासन प्रमुख यांनी त्यांना दुय्यम अधिकाऱ्यास अंतिम निर्णय घेण्यासाठी शक्ती प्रदान करावयाच्या आहेत.

त्यानुषंगाने वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या कोषागार प्रशासन कक्षातील कार्यासनांशी [कोषागार (प्रशा-१),कोषागार (प्रशा-२), कोषागार (प्रशा-३)] संबंधित विषयांच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दि.११.०८.२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०७१२११५३४९१७०५ असा आहे. हा कार्यालयीन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2018.07.12 16:45:39 +05'30'

**( शुभांगी शेठ )**
सहसचिव (कोषा प्रशासन), वित्त विभाग

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (व्यय), यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व सह सचिव/ उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (आस्थापना), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवडनस्ती.

**कार्यालयीन आदेश, वित्त विभाग क्रमांक.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०२/को.प्र.२, दि.१२/०७/२०१८ सोबतचे विवरणपत्र** महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनिमय आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९(२) अंतर्गत कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिकारांचे तीन स्तर निर्धारित करणे.

| अ.क्र. | कार्यासन | कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज | | सादरीकरणाचे ३ स्तर | | | अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी | आदेश निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोषागार (प्रशा-१) | १ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांची खालील प्रकरणे | क.अ. | अ.स. | उ.स /स.स (कोषा) | प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) | अ.स./उ.स./स.स (कोषा) |
| | | अ | विभागीय चौकशी | | | | | |
| | | ब | अभियोग दाखल करण्यासंबधीची प्रकरणे | | | | | |
| | | क | सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे | | | | | |
| | | ड | अगोदरची सेवा निवृत्तीवेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राहय धरण्याबाबतची प्रकरणे | | | | | |
| | | २ | वरील विषयासंबधीची न्यायालयीन प्रकरणे, लोकसभा/राज्यसभा, विधानसभा/ विधानपरिषद प्रश्न,ठराव इ.बाबी | | | | | |
| २ | कोषागार (प्रशा-२) | १ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील राजपत्रित वर्ग-१, व वर्ग-२ अधिका-यांशी संबधीत खालील प्रकरणे | क.अ. | अ.स. | उ.स /स.स (कोषा) | प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) | अ.स./उ.स./स.स (कोषा) |
| | | अ | संवर्गाचे सेवाप्रवेश नियम व परिक्षा नियम तयार करणे | | | | | |
| | | ब | नामनिर्देशनाने नियुक्त्या व त्यानुषंगाने येणारे इतर विषय जसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविणे,जाती प्रमाणपत्र पडताळणी,वैद्यकीय तपासणी,पोलीस अहवाल इ. | | | | | |
| | | क | परिविक्षाधीन कालावधी समाप्त होईपर्यंतचीं प्रकरणे | | | | | |
| | | ड | बदल्या/प्रतिनियुक्तीची प्रकरणे | | | | | |
| | | इ | सुधारीत वेतननिश्चिती प्रकरणे | | | | | |
| | | फ | जन्मदिनांक बदलून देण्याबाबतची प्रकरणे | | | | | |
| | | ग | वर्ग-१ व वर्ग-२ पदांवरील पदोन्नतीसाठी निवडसूच्या तयार करणे/सुधारित करणे व त्यास आयोगाची मान्यता मिळविणे. | | | | | |
| | | ह | जेष्ठतासूची तयार करणे/मानीव दिनांकाबाबतची प्रकरणे/जेष्ठतेबाबतची अभिवेदने | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | य | गोपनीय अहवालांचे जतन करणे,संस्करण व प्रतिकुल शेरे कळविणे,गोपनीय अहवालातील शे-यांवरील अभिवेदनासंबधीची कार्यवाही. | | | | | |
| | | ज | विशेष पुर्नर्विलोकन समितीपुढे ठेवावयाची प्रकरणे | | | | | |
| | | ल | दक्षतारोध प्रकरणे | | | | | |
| | | म | जिल्हा परिषद कर्मचा-यांची महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा-२ संवर्गात निवडीने नियुक्ती,निवडसूची,जेष्ठतेबाबतची प्रकरणे. | | | | | |
| | | न | स्थायीकरण | | | | | |
| | | प | निवृत्तीवेतन विषयक बाबी | | | | | |
| | | र | आगाऊ वेतनवाढी देण्याविषयीच्या बाबी. | | | | | |
| | | २ | वरील विषयासंबधीची न्यायालयीन प्रकरणे,लोकसभा/राज्यसभा,विधानसभा/विधानपरिषद प्रश्न,ठराव इ.बाबी. | | | | | |
| ३ | कोषागार (प्रशा-३) | १ | लेखा व कोषागारे संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची विमान प्रवासास मंजूरी देण्याबाबतची प्रकरणे. | क.अ. | अ.स. | उ.स /स.स (कोषा) | प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) | अ.स./उ.स./स.स (कोषा) |
| | | २ | लेखा व कोषागारे संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे,वाहनभत्ता मंजूर करणे | | | | | |
| | | ३ | लेखा व कोषागारे संचालनाल व इतर यातील राजपत्रित अधिकारी/अराजपत्रित कर्मचारी संघटनेच्या मागण्यांविषयीच्या बाबी (समन्वय) | | | | | |
| | | ४ | लेखा व कोषागारे संचालनालयाच्या आस्थापनेवर नविन पदे निर्माण करणे /हंगामी पदे पुढे चालू ठेवणे,पदे स्थायी ( कायम) करण्याबाबतच्या बाबी. | | | | | |
| | | ५ | वर्ग-१ व वर्ग २ संवर्गातील अधिका-यांची घर/वाहन खरेदीस मंजूरी देण्याबाबतची प्रकरणे. | | | | | |
| | | ६ | वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील अधिका-यांना भविष्य निर्वाह निधीतून अग्रिम मंजूर करणे. | | | | | |
| | | ७ | लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिपत्याखालील राजपत्रित अधिका-यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देणे/परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अतिरिक्त संधी देण्याबाबतची प्रकरणे. | | | | | |
| | | ८ | वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील अधिका-यांना मराठी/हिंदी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबतची प्रकरणे. | | | | | |
| | | ९ | पदनामांचे सुसूत्रिकरण. | | | | | |
| | | १० | लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिपत्याखालील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचा-यांशी संबधीत खालील प्रशासकीय बाबी. | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ) सर्व आस्थापनाविषयक बाबी. | | | | | |
| | | | ब) परिक्षेसंबधीच्या बाबी | | | | | |
| | | | क) प्रतिनियुक्ती | | | | | |
| | | | ड) विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणे | | | | | |
| | | | इ) जेष्ठतासूचीसंबधी | | | | | |
| | | | फ) लेखा व कोषागारे संचालनालय व त्याच्या अधिपत्याखालील कार्यालयासंबधीची नियतकालीक विवरणे (मासिक,तिमाही,सहामाही,वार्षिक) | | | | | |
| | | | ग) सेवाप्रवेश नियम व परिक्षा नियम | | | | | |
| | | | ह) राजपत्रित अधिकारी/अराजपत्रिक कर्मचारी यांच्या प्रशिक्षण विषयक शासन/इतर संस्था) | | | | | |
| | | | ज) लेखा व कोषागारे संचालनालयाच्या निरिक्षणाबाबत. | | | | | |
| | | | ल) भविष्य निर्वाह निधी, इतर अग्रिम मंजूर करणे, आगाऊ वेतनवाढी संबधीच्या बाबी. | | | | | |
| | | ११ | अराजपत्रित कर्मचा-यांविषयी ( विषयसूचीत समाविष्ट नसलेली इतर प्रकरणे) | | | | | |
| | | १२ | सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभागातील प्रशासन कार्यासनांना सादर करावयाची एकत्रित माहिती -समन्वय करणे. | | | | | |
| | | १३ | वरील विषयांसंबधीची न्यायालयीन प्रकरणे, लोकसभा/ राज्यसभा/ विधानसभा/ विधान परिषद प्रश्न,ठराव इ.बाबी. | | | | | |
| | | १४ | स्थानिक निधी लेखा संचालनालयाच्या सर्व आस्थापना विषयक बाबी. | | | | | |

टिप -या तिन्ही कार्यासनाशी संबंधित प्रकरणे नियम व आवश्यकतेनुसार अप्पर मुख्य सचिव.मंत्री यांचेकडे सादर करण्यात येतात.मा/राज्यमंत्री.मा/